पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८
वैद्यकीय विभाग मख्य कार्यालय
जा.क्र वैद्य/७/कावि/ २०३१/ २०१४
दि- ०५ /११ /२०१४

**विषय:- धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ चे अंमलबजावणीबाबत**

**<u>परिपत्रक</u>**

पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ तयार केली असून त्याची अंमलबजावणी करणेचे प्रस्तावित आहे. सदर धोरणास मा. महापालिका सभेने ठराव क्र ४७५, दि २०/०२/२०१४ तसेच महापालिका सभा ठराव क्र ५४९ दि १९/०८/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरची योजना मनपा अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बंधनकारक तर सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता ऐच्छिक स्वरुपाची आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ चे अंमलबजावणी करणेपुर्वी कर्मचा-यांची सभासद नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्र (नमुना "अ") प्रमाणे सर्व संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन सभासद नोंदणी फॉर्म भरुन घेणे आवश्यक आहे. यामध्ये मनपा अधिकारी/कर्मचारी यांचे दरमहाचे वेतनातून र रु. ३००/- प्रमाणे व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन दरमहा वेतनामधुन र.रु. १५०/- निधीची रक्कम कपात करणेत येणार आहे. तशी संमती सोबत सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रादवारे देणे आवश्यक आहे.

सबब सर्व संबधित शाखाप्रमुखांना यादवारे कळविणेत येते की, प्रस्तुतचे परिपत्रक आपले विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन यावे. आपले विभागामध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे फॉर्म भरताना संबधित आस्थापना लिपीकाने संगणकावर फॉर्म भरुन त्याची एक प्रत (Hard Copy) वैद्यकीय मुख्य कार्यालयास पाठवावी. तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांची माहिती लेखा विभागामार्फत भरणेत यावी. सभासद नोदंणी करणा-या अधिकारी/कर्मचा-यांनाच या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेची सविस्तर माहीती मनपाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेसाठी मासिक वर्गणी कपात करणेबाबत स्वतंत्रपणे अलाहीदा आदेश निर्गत करणेत येईल याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**(राजीव जाधव)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**सोबत**

१.प्रतिज्ञापत्र नमुना "अ"
२. प्रतिज्ञापत्र नमुना "ब"

Scanned by CamScanner